# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (क्यु बी पी एल)च्या प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांकरिता विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ) विनियम, २०१४**

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/क्यु बी पी एल/२०१३/** : विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे:-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

१) या विनियमांना, “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (क्यु बी पी एल)च्या प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ) विनियम, २०१४”, असे म्हणावे.

२) हे विनियम भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली, यांनी दि. १४ सप्टेंबर, २००७ च्या एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ. १४५८ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील.

३) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

## २ व्याख्या

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर:-

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) ;

(बी) **"सह-विकासक"** चा अर्थ, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (एफ) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील;

(सी) **"विकासक"** चा अर्थ, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील;

(डी) **"मानीव वितरण परवानाधारक"** म्हणजे क्युबीपीएल, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचना क्र. एसओ ५२८ (इ) द्वारा अधिनियमाच्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसइझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे;

(इ) **"सर्वसाधारण अटी"** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(एफ) **"क्युबीपीएल "** म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणी झालेली आणि वाणिज्यिक मंत्रालय, विशेष आर्थिक क्षेत्र वाणिज्यिक विभाग, यांनी

निर्गमित केलेल्या पत्र क्र. एफ.२/१२५/२००६-इपीझेड, दिनांक २० जून, २००७ आणि अधिसूचना क्र. एस.ओ.१४५८(इ), दिनांक १४ सप्टेंबर, २००७ अन्वये माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांविषयक विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विकासक म्हणून मान्यता दिलेली **'**मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (पूर्वीची डीएलएफ आकृती इन्फो पार्क्स (पुणे) लि.)**'**;

(जी) **"एसइझेड अधिनियम"** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५;

(एच) **"एसइझेड नियम"** म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही अशा सर्व शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३ व्याप्ती

"क्युबीपीएल" च्या संबंधातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या "क्युबीपीएल" च्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण व किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

## ४ “वितरणाचे क्षेत्र” किंवा “पुरवठ्याचे क्षेत्र”

मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग ) यांनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३ अंतर्गत निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचना क्र. एस. ओ. १४५८) (इ) दि. १४ सप्टेंबर, २००७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबींच्या अधीन राहून, प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इफो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे, येथील १०.३३ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र सोबतच्या अनुसूची १ मधील नकाशामध्ये अधिक तपशिलासह आरेखित करण्यात आले आहे.

## ५. परवान्याची मुदत

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दिनांक १४ सप्टेंबर, २००७ पासून (म्हणजेच एसइझेड अधिसूचनेच्या दिनांकापासून) दिनांक १३ सप्टेंबर, २०३२ पर्यंतच्या पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरिता, अंमलात राहील.

## ६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करील.

## ७. अखंडित विजेचा पुरवठा

मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात चोवीस तास (२४) अखंडित विजेचा पुरवठा करण्याची व्यवस्था करील.

**८ दुरुस्ती करण्याचे अधिकार**

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येईल. या विनियमांत करण्यात आलेला कोणताही बदल त्यासंबंधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू होईल आणि तो बदल त्यानंतर त्याच्या फक्त बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहील किंवा राहणार नाही, जसे असेल तसे.


**९ अडचणी दूर करण्याचे अधिकार**

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : -------------, २०१४.

अनुसूची-१




TRUE COPY

9 MAR 2013

N. R. YEOLEKAR
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE